आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
११ सप्टेंबर २०२६ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- १८ व्या 'ब्रिक्स' शिखर परिषदेसाठी भारत सज्ज/ प्रधानमंत्री मोदी करणार जगभरातल्या विविध नेत्यांशी द्विपक्षीय चर्चा

- यूपीआयच्या माध्यमातून ब्रिक्स सदस्य देशांनी एकमेकांच्या पेमेंट प्रणाली जोडाव्यात असं वाणिज्य आणि उद्योग मंत्र्यांचं आवाहन

- फास्टॅगसाठी वनटॅग सुविधेचं केंद्रीय परिवहन मंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- उद्योजकतेसाठीच्या जागतिक पिचबुक क्रमवारीत देशातल्या ९ शैक्षणिक संस्थांचा पहिल्या शंभरात समावेश

**आणि**

- महाराष्ट्रात दोन वेगवेगळ्या रस्ते अपघातात एकूण १६ जणांचा मृत्यू

**<><><><><>**

भारताच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली इथं उद्यापासून सुरु होत असलेल्या १८ व्या 'ब्रिक्स' शिखर परिषदेसाठी जगभरातले नेते एकत्र येणार असून, जागतिक कल्याणाचं उद्दिष्ट समोर ठेवून या परिषदेत विविध मुद्द्यांवर सकारात्मक आणि अर्थपूर्ण चर्चा होईल, असा विश्वास प्रधानमंत्री मोदी यांनी समाजमाध्यमवरच्या पोस्ट मधून व्यक्त केला आहे.

भारत मंडपम इथं होणाऱ्या या दोन दिवसीय शिखर परिषदेत ब्राझील, चीन, इजिप्त, इथिओपिया, इंडोनेशिया, भारत, इराण, रशिया, सौदी अरेबिया, दक्षिण आफ्रिका आणि संयुक्त अरब अमिराती, यासारख्या अकरा प्रमुख उदयोन्मुख आणि विकसनशील अर्थव्यवस्था एकत्र येत आहेत. 'लवचिकता, नवोन्मेष, सहकार्य आणि शाश्वततेसाठी उभारणी' ही यंदाच्या ब्रिक्स शिखर परिषदेची संकल्पना आहे.

या शिखर परिषदेत रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन, चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग, दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष सिरिल रामाफोसा, इजिप्तचे अध्यक्ष अब्देल फताह अल-सिसी, इंडोनेशियाचे अध्यक्ष प्राबोवो सुबियांतो, इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान आणि अबू धाबीचे

युवराज शेख खालिद बिन मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांच्यासह इतर जागतिक नेते सहभागी होत आहेत.

‘समावेशक जागतिक प्रशासन आणि बहुपक्षीयतेचं बळकटीकरण’ या विषयावरच्या ब्रिक्स सदस्य देशांच्या सत्रानं उद्या या शिखर परिषदेची सुरुवात होईल. त्यानंतर ब्रिक्स सदस्य देशांचे नेते भारत मंडपम इथल्या 'भारत इनोव्हेट्स' या प्रदर्शनाला भेट देतील. शिखर परिषदेदरम्यान प्रधानमंत्री मोदी ब्रिक्स देशांच्या नेत्यांबरोबर द्विपक्षीय बैठका आयोजित करतील. येत्या रविवारी, प्रधानमंत्री ब्रिक्स भागीदार देश आणि विशेष निमंत्रित देशांच्या नेत्यांचं औपचारिक स्वागत करतील.

<><><><>

नवी दिल्लीत उद्यापासून सुरु होत असलेल्या ब्रिक्स शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जगभरातल्या विविध नेत्यांबरोबर द्विपक्षीय चर्चा करतील. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी आज दुपारी होणाऱ्या चर्चेत रशिया-युक्रेन संघर्ष, पश्चिम आशियातली परिस्थिती, व्यापार संबंध आणि ऊर्जा क्षेत्रातलं सहकार्य, यासह परस्पर हिताच्या विविध मुद्द्यांचा समावेश असेल. उद्यापासून सुरू होत असलेल्या 'ब्रिक्स' परिषदेत सहभागी होण्यासाठी व्लादिमीर पुतिन आज पहाटेच राजधानीत दाखल झाले.

प्रधानमंत्री मोदी आज संध्याकाळी इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करतील. पेझेश्कियान आज दुपारी नवी दिल्लीत दाखल होतील. पश्चिम आशियातल्या सध्याच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्वाची मानली जात आहे. दोन्ही नेत्यांमधल्या चर्चेत प्रादेशिक घडामोडी हा प्रमुख विषय असेल अशी अपेक्षा आहे. प्रधानमंत्री मोदी आणि संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांची भेटही नियोजित आहे.

<><><><>

ब्रिक्स शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज नवी दिल्ली इथं रशियन फेडरेशनचे उपप्रधानमंत्री डेनिस मंतुरोव्ह यांची भेट घेतली. यावेळी दोन्ही नेत्यांमध्ये परस्पर हिताच्या मुद्द्यांवर तसंच व्यापार आणि गुंतवणुकीचे संबंध अधिक दृढ करण्यावर चर्चा झाल्याचं सीतारामन यांनी समाजमाध्यमवरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

<><><><>

यूपीआयच्या माध्यमातून ब्रिक्स सदस्य देशांनी त्यांच्या पेमेंट प्रणालींना एकमेकांशी जोडावं, स्थानिक चलनातल्या व्यापाराला प्रोत्साहन द्यावं आणि डीजिटल व्यापार जागतिक स्तरावर अधिक सुलभ करावा असं आवाहन वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी आज केलं. ते आज नवी दिल्लीत आयोजित ब्रिक्स बिझनेस फोरम २०२६ परिषदेच्या उद्घाटन सत्राला संबोधित करत होते. भारताने 'डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा' उभारण्याच्या दिशेने महत्वाची पावलं उचलली असून, यूपीआयद्वारे होणाऱ्या व्यवहारांची संख्या वर्षाला अडीचशे अब्जांच्या पुढे गेल्याचं ते यावेळी म्हणाले. भागीदार देशांमधला व्यापार हा सखोल आणि लवचिक असावा, तसंच पुरवठा साखळ्यांमध्ये विविधता असावी, जेणेकरून व्यापार हा कोणत्याही टप्प्यावर सदस्य देशांमधल्या लोकांच्या विकासासाठी आणि कल्याणासाठी अडथळा ठरणार नाही, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

अमेरिकेत वर्ल्ड ट्रेड सेंटरवर ११ सप्टेंबर २०११ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मरण पावलेल्यांना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आदरांजली वाहिली. जगभरात दहशतवादाने अगणित बळी घेतले आहेत आणि सीमेपलीकडून होणाऱ्या दहशतवादाचा सामना करणारा देश म्हणून भारत गेली कित्येक दशकं या लढ्यात पुढे आहे, असं प्रतिपादन त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात केलं. एकीकडे दहशतवादाचं स्वरूप बदलत असताना सर्व प्रकारच्या दहशतवादाला विरोध करायचा भारताचा निर्धार मात्र अढळ आहे, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

मुंबईत आयोजित ग्लोबल फिनटेक परिषदेत फास्टॅगसाठी वनटॅग सुविधेचं उद्घाटन आज केंद्रीय महामार्ग आणि रस्तेवाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते झालं. या सुविधामुळे बँकखातं बदललं तरी फास्टॅग सुविधा सहजतेने नव्या खात्याशी जोडता येणार आहे. या आर्थिक वर्षाच्या अखेरीपर्यंत टोलनाक्यांवर थांबण्याचा वेळ १० सेकंदांपेक्षा कमी होऊ शकेल असं गडकरी यांनी सांगितलं. टोलनाक्यावर थांबावं न लागता टोल भरता यावा अशी यंत्रणा विकसित करण्याचा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचा प्रयत्न आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

उद्योजकतेला प्रोत्साहन देणाऱ्या शैक्षणिक संस्थासाठीच्या ‘पिचबुक’ जागतिक क्रमवारीत देशातल्या ९ शैक्षणिक संस्थांनी पहिल्या शंभरात स्थान मिळवलं आहे.

पदवीशिक्षण पातळीवर आयआयटी मुंबई २२व्या तर आयआयटी दिल्ली २७व्या क्रमांकावर आहे. याखेरीज दिल्ली विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, बिट्स पिलानी, आयआयटी मद्रास, आयआयएम बंगलोर, आयआयएम कलकत्ता, तसंच इंडीयन स्कूल ऑफ बिझनेस या संस्थांचा या मानांकनात समावेश आहे.

**<><><><><>**

नांदेड जिल्ह्यात भोकर मार्गावर सीताखंडी घाटात काल संध्याकाळी एका ट्रकने, रिक्षाला धडक देऊन झालेल्या अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला, तर ४ जण जखमी झाले. जखमींमध्ये ट्रक चालकाचा समावेश आहे. जखमींना भोकर आणि नांदेड इथल्या शासकीय रुग्णालयात दाखल केल्याचं आमच्या वार्ताहरानं सांगितलं.

या अपघातात झालेल्या जीवितहानीबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला असून, प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून मृत व्यक्तींच्या जवळच्या नातेवाईकाला दोन लाख रुपये, तर जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**<><><><><>**

भंडारा जिल्ह्यात नागपूर-रायपूर राष्ट्रीय महामार्गावर पिंपळगाव सडक परिसरात आज पहाटे एका ट्रकने पिकअप व्हॅनला धडक देऊन झालेल्या अपघातात **८ जणांचा मृत्यू झाला, तर ३** जण गंभीर जखमी झाले. जखमींना साकोली इथल्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल केलं आहे. या अपघाताची पोलीस चौकशी सुरु आहे.

**<><><><><>**

एचपीव्ही लसीकरणाचा ८० लाखांहून अधिक टप्पा भारताने पार केला आहे. प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा अधिक बळकट करण्यासोबतच एचपीव्ही संसर्ग आणि एचपीव्हीशी संबंधित कर्करोगापासून संरक्षणाच्या दिशेने हा महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

**<><><><><>**

बिहारमधली पूरस्थिती अजूनही गंभीर असून, १४ जिल्ह्यांमधल्या ८५ तालुक्यांतले ४४ लाखांपेक्षा जास्त नागरिक पुरामुळे बाधित झाले आहेत. पूरग्रस्त भागात बचावकार्य सुरु असून, १ हजार ९४२ बोटी कार्यरत आहेत, तर ८१२ वैद्यकीय शिबिरं उभारण्यात आली

आहेत. राज्यातल्या प्रमुख नद्यांची पाणी पातळी ओसरत आहे, तरीही, आठ नद्यांची पाणी पातळी अजूनही धोक्याच्या पातळीच्या वर आहे.

**<><><><><>**

अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत महिला एकेरी प्रकाराच्या दुसऱ्या उपांत्य फेरीत कझाकस्तानच्या एलेना रायबाकिना हिने अमेरिकेच्या कोको गॉफ हिचा पराभव केला आहे. या विजयामुळे रायबाकिनाचं अंतिम फेरीतलं स्थान निश्चित झालं असून आता तिचा सामना अरिना सबालेंका हिच्याशी होईल. महिला दुहेरीत, चेक-अमेरिकन जोडी कॅटेरिना सिनियाकोव्हा आणि टेलर टाउनसेंड यांचा सामना आज रात्री अमेरिकन जोडी रॅाबिन मॅान्टगोमेरी आणि ॲशलिन क्रुगर यांच्याशी होईल.

पुरुष एकेरीत, जर्मनीचा अव्वल मानांकित अलेक्झांडर झ्वेरेव्ह याचा सामना आज रात्री होणाऱ्या पहिल्या उपांत्य फेरीत रशियाचा कॅरेन खाचानोव्हशी होईल. उपांत्य फेरीचा दुसरा सामना आठवा मानांकित बेन शेल्टन आणि अकरावा मानांकित फ्रान्सिस टियाफो यांच्यात होणार आहे.

**//<><><><><>//**